# Dedicated Covid Health center (DCHC)

# Bulletin

**08.06.21**



# प्रगल्भतेचा सहप्रवास

## Matrumandir-Devrukh

MATRUMANDIR DCHC

# Daily Patient Update

**08.06.21**

| | Total Capacity | Total Occupancy | Available Beds |
|---|---|---|---|
| Total Beds | 30 | 17 | 13 |
| With O2 | 8 | 0 | 8 |
| Without O2 | 13 | 12 | 1 |
| Icu beds | 9 | 5 | 4 |
| Ventilators | 0 | 0 | 0 |

संपर्क : - SMS हॉस्पिटल
7798241390 / 02354260026



# प्रगल्भतेचा सहप्रवास

मातृमंदिर कोविड सेंटर सुरु करताना अनेक आश्चर्यजनक अनुभव आले. काही गोड, काही कडवट, तर काही अगदी तटस्थ या जगताशी जणू आमचा काही संबंधच नाही अशा स्वरूपाचे. मात्र यातील शेखर सरांची झालेली भेट, सहकार्य हे राजकारण आणि सामाजिकतेच्या पलीकडील. एक अनामिक भावनिक आणि स्नेहमय कौटुंबिक नाते जोडणारे होते.

या प्रकल्पात त्यांचा उत्स्फूर्त सहभाग हा अगदी कुटुंबातील व्यक्ती इतका सहज निरामय होता. त्यात कुठेही न्हवता मदतीचा अभिनिवेश की पदाच्या सन्मानाची राखीवता. आजच्या राजकीय जीवनात अशी विनम्र, संवेदनशील सहजता फारच अभावाने आढळते. त्यामुळेच मातृमंदिरचे हे भाग्यच आहे कि शेखर निकम यांच्यासारखा एक जिवाभावाचा सहकारी संस्थेच्या पुढील दैदिप्यमान वाटचालीत सहप्रवासी लाभला याचे.

एप्रिल अखेरीला संगमेश्वर तालुका परिसरातील कोविड रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली. जवळचे काही सहकारी मयत झाले. येथील रुग्णांना रत्नागिरी-कोल्हापूर हाच पर्याय असताना तेथेही बेड नाही या धक्क्यानेच रुग्ण अत्यवस्थ होत असणारे चित्र भीषण होते. या परिस्थितीत मातृमंदिरने डॉ.परमेश्वर गौंड यांच्या सहकार्याने कोविड रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय घेतला. यात रुग्णांना अधिकाधिक सवलती देता याव्यात यासाठी मातृमंदिरचे हितचिंतक यांना आवाहन करण्यासाठी एक whatsapp ग्रुप तयार केला. यात संबंधित, परिचित मर्यादित लोकांनाच घेतले. यात कोविड सेंटर सुरु करत असल्याची माहिती देत मातृमंदिर संस्थेला आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले.

या आवाहनाला पहिल्या काही जणांचा जो उत्साह द्विगुणीत करणारा प्रतिसाद होता त्यात आमदार शेखर निकम यांचे नाव प्राधान्याने होते.

सुरुवातीला मला वाटले राजकारण्यांचे काय मनावर घ्यावे. त्यांना तर मोठी मोठी आश्वासने द्यायची सवय असते आणि नंतर आपणही ती विसरून जायची असतात. मात्र निकम सरांचे माझे असणारे संबंध यामुळे मी थोडे धिटाईने खात्री करून घेण्यासाठी त्यांना मेसेज केला. “आपण जाहीर केलेली रक्कम ट्रान्सफर केल्यावर कळवा म्हणजे ती मातृमंदिरच्या वेबसाईटवर अपडेट करणे शक्य होईल.” दुसऱ्याच दिवशी त्यांनी रु.२५,०००/- मातृमंदिरच्या नावे ट्रान्सफर केले. यावरच ते थांबले नाहीत तर या कामासाठी शक्य ती सर्व मदत करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

काही दिवसातच मातृमंदिरने नवनिर्माण नर्सिंग महाविद्यालयाच्या सहकार्याने कोविड मधून बऱ्या होणार्या रुग्णांसाठी समुपदेशन केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या उद्घाटनाला आ.शेखर निकम उपस्थित राहिले आणि येताना त्यांनी विविध व्यक्ती, संस्था यांच्याकडून जवळपास १.२५ लाखाची देणगीचे चेकच सोबत आणले. राणे ट्रस्टच्या स्मृती राणे यांच्याकडून वस्तू रुपात पीपीई कीट, ऑक्सिमीटर, मास्क इत्यादी साहित्य मिळवून दिले. अशी मदत करून ते थांबले नाहीत तर त्यांनी हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी संवाद केला. येथे कोणत्या वस्तूंची गरज आहे याची नोंद घेतली आणि त्याप्रमाणे काही कंपन्यांकडे प्रयत्न करण्याचे सूचित केले. येथील व्यवस्थापन-नियोजन-आयोजन डॉ.परमेश्वर गौंड यांचे एसएमएस हॉस्पिटल पाहत आहे हे ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले.

रत्नागिरीतील फिनोलेक्स कंपनी ही त्यांच्या रत्नागिरी-पावस कार्यकक्षेबाहेर मदतरूप होईल का याची शाश्वती न्हवती मात्र आ.निकम यांनी त्याचा पाठपुरावा केला आणि त्यांच्याकडून पाच ऑक्सिजन कॉन्सट्रेटर मिळवून देत मातृमंदिर कोविड सेंटर अधिक ऑक्सिक्षम केले. यातील आणखी एक पुढील पाऊल म्हणजे लवकरच आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नाने एका ट्रस्टमार्फत मातृमंदिर देवरुख येथे ऑक्सिजन निर्मितीचा स्वतंत्र प्लंट उभारला जात आहे.

सध्याच्या कोविड सेंटर पुरत्या आरोग्य यंत्रणेकडे ते पाहत नाहीत. तर या भागातील आरोग्य सुविधा कशा प्रकारे अद्ययावत करता येईल, हा त्यांचा दूरगामी विचार फार महत्वाचा वाटतो. आ.शेखर निकम यांची कार्यप्रणाली फारच वेगळ्या धाटणीची आहे. गेल्या दोन दशकात ह्या संस्काराची सवय हा तालुका विसरून गेला होता. कार्यकर्ते आणि मतदारांना भारावून टाकणाऱ्या घोषणा आणि प्रत्येक क्षणाचे भपकेबाज मार्केटिंग, आश्वासनांची दे-मार खैरात अशी गेल्या दोन दशकाची सवय. त्यामुळे अशा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था राजकीय लोंढ्यांना बिचकून असायच्या. मात्र राजकीय शासन, प्रशासन आणि सामाजिक संस्थातील व्यवस्थापन यांच्यातील दुवा उत्तम प्रकारे जुळल्यास लोकोपयोगी कामांची एक मांदियाळीच तयार होईल. हा संस्कार शेखर निकम यांच्या संयमी आणि आदबशीर स्वभावातून सतत प्रतीत होतो. त्यांच्या या नव्या राजकीय शैलीत त्यांचे पिताश्री माझी खासदार आणि शिक्षण महर्षी गोविंदराव निकम यांच्या प्रगल्भ राजकीय नेतृत्वाच्या खुणा दिसत राहतात.

मातृमंदिर परिसरात गेल्या पंधरा दिवसात आमदार निकम यांचे दोनवेळा येणे झाले. वेळेचे बंधन पाळणे हे ते फार कसोशीने पाळत असल्याचे जाणवले. आणखी एक प्रकर्षाने जाणवले कि ज्या मूल्याधारित वैचारिक बैठकीची जडण-घडण मातृमंदिरच्या या भूमीत बॅ. नाथ पै यांच्यापासून रुजली आणि विस्तारली, त्यातील प्रा.मधु दंडवते आणि जगन्नाथ जाधव यांच्या कार्यशैलीची आठवण या निमित्ताने झाली. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना राजकीय सहकार्य मिळाले तर त्या लोकोपायोगाची कामे अधिक जोमाने आणि दीर्घकाळासाठी करू शकतील.

मातृमंदिर रुग्णालय हे या परिसरातील १०० गावांना अद्ययावत आरोग्य सुविधा देणारे आरोग्य आधार केंद्र व्हावे हे आ.शेखर निकम यांचे स्वप्न, मातृमंदिर येत्या काही वर्षात नक्कीच वास्तवात साकारेल असा विश्वास या नव्या समीकरणाने अधिक प्रबळ होत आहे. एक नवी वैचारिक, प्रगल्भ सुसंस्कारित सामाजिक संस्कृती देवरुख परिसरात आकार घेत आहे. हजारोंचे हात त्यात सहभागी आहेत. आमदार निकमांचा निरपेक्ष सहभाग हा एक अनमोल आदर्श आहे.

**अभिजित हेगशेट्ये**
कार्याध्यक्ष, मातृमंदिर –देवरुख

**Thank You**



# लिहित्या हाताचे 'सर्जन'

**कोकणातील पाहिले Chain Hospital सुरु करणारे आणि कोविडच्या या आपत्तीमध्ये रुग्णांच्या सोयीसाठी जिथे आवश्यकता आहे अशा दुर्गम भागात 5 कोवीड सेंटर चालवणारे डॉ.परमेश्वर गौंड याचं एस.एम.एस. हॉस्पिटल हे हजारो कोविड रुग्णांना योग्य उपचारांनी करोनामुक्त करत आहे.**

डॉक्टरांना 'तुम्ही इतकी कोविड सेंटर चालवण्यामागचा विचार काय' असं विचारल्यावर डॉक्टरांनी थोडं मागे जावून सांगायला सुरुवात केली. MS झाल्यानंतरही आपण डॉक्टर म्हणून प्रक्टिस किती करू याबाबत जरा शंकाच होती असं डॉक्टर हसत सांगतात. याचं कारण म्हणजे त्याचं खरं मन रमत होतं वेगळ्याच क्षेत्रात. Mountaineering and Film Industry. यातही 'स्क्रिप्ट रायटिंग आणि डायरेक्शन' हे डॉक्टरांचं खरं पॅशन.

एक शॉर्ट फिल्म तयार करण्यासाठी म्हणून पहिल्यांदा डॉक्टर कोकणातील दापोलीला आले. त्यांचा भाऊ इथे चिपळूणलाच आहे. भावाचे मित्र जे परशुराम कॉलेजचे प्राचार्य आहेत त्यांना कळल्यानंतर त्यांनी सुचवलं कि तू इकडेच शिफ्ट हो आणि इथे आयुर्वेदिक कॉलेजला प्रॅक्टिस करता करता तुझ्या छंदांनाही वेळ देता येईल . त्याप्रमाणे डॉक्टर इकडे आले.

डॉक्टर गौंड यांच्यासारखा माणूस जे करेल ते उत्तमच असेल अशाप्रकारचा त्यांचा आत्तापर्यंतचचा प्रवास सांगतो. शाळा कॉलेज मध्ये टॉपर असलेला हा माणूस इकडे आल्यावर केवळ 5 वर्षामध्ये कोकणातील पाहिलं चैन हॉस्पिटल सुरु करतो आणि सोबतच आता कोविडमध्ये केवळ दुर्गम भागातील रुग्णांसाठी म्हणून तब्बल 5 कोविड हॉस्पिटल चालवतो यातूनच त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीचा अंदाज येतो.

स्वतः डॉक्टरांचे आई-वडील जेव्हा कोविड पॉझीटिव्ह आले, त्यावेळी त्यांना दुर्गम भागातील कोविड रुग्णांची अडचण खऱ्या अर्थाने लक्षात आली. केवळ योग्य ट्रीटमेंट न मिळाल्याने रुग्णाला मृत्यू येणे हे काही बरोबर नाही असा विचार करून डॉक्टरांनी आपलं वैद्यकीय ज्ञान व अनुभव याचा उपयोग करून कोविड रुग्णांसाठी कोविड हॉस्पिटल सुरु करायचे ठरवले. एक-एक करता एकूण 5 ठिकाणी हि सेंटर सरू झाली. पण डॉक्टरांनी ठरवून एक निर्णय घेतला होता कि हे सेंटर जिथे गरज असेल तिथेच चालवायचे. रुग्णांना जागच्या जागी सेवा मिळाली तर त्यांची व नातेवाईकांची फरफट थांबेल. यातील उद्देश केवळ पैसे कमावणे नसून आवशयक तिथे सेवा देणे असाच आहे हि स्पष्टता त्यांनी सर्व सहकार्यांनाही दिली.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये मृत्यूदर ज्यास्त असल्याने सुरुवातीच्या काळात डॉक्टरांना फार निराश वाटायचं. पेशंट आपल्या हॉस्पिटलला येतो आणि काहीच वेळात त्याचा मृत्यू होतो हे पाहून व्यथित झालेल्या संवेदनशील डॉक्टरांना यातून बाहेर येण्यासाठी शेवटी एक दिवस सुट्टी घेवून कुटुंबासह वेळ काढला. या सुट्टीच्या दिवशीच त्यांच्या 5 वर्षाच्या मुलीने त्यांना सांगितलं “बाबा, तू दर रविवारी सुट्टी घे ना..” या एका उदाहरणातून कोविड काळात मागील वर्षभर अविरत सेवा देणारे जगभरातील डॉक्टर कशा स्थितीत काम करताहेत याची कल्पना येते.

मातृमंदिरसारख्या रुग्णसेवेचा मोठा वारसा असलेल्या संस्थेसोबत काम करताना आनंद होतोच पण सोबतच मातृमंदिरच्या हितचीन्तकांकडून मिळत असलेल्या मदतीमुळे आपल्या ग्रामीण भागातील रुग्णांना अधिक चांगली व स्वस्त सेवा आपण देवू शकतो तेव्हा अधिक समाधान मिळते असं डॉक्टर आवर्जून सांगतात.

या कोविडच्या विळख्यातून हे जग लवकर मोकळे होवो व डॉ.परमेश्वर गौंड सारख्या कलाकार माणसाला त्यांचे छंद जोपासायला सवड मिळो याच सदिच्छा.

**Proud of You**

# एक एक घर वाचवूया ...

“साहेब, वर्षभर कामावर नाहीय. जवळ अजिबात पैसा नाही. आई आणि बाबा दोघेही आपल्या कोविड सेंटरला ॲडमिट आहेत.. हा कागद बघा..आज बायकोचं मंगळसूत्र गहाण ठेवून पैसे आणलेत.” उदय घाणेकर हा तरुण भरल्या डोळ्यांनी आम्हाला सांगत होता.

उदयची आई ICU मध्ये होती. बाबांना डिस्चार्ज मिळणार होता म्हणून हॉस्पिटल बिलात सवलत मिळावी म्हणून विनंती करायला आला होता. आपल्या करोना सेंटरमध्ये सरकारी दरातच बिल केलं जातं. असं असले तरीही १३-१४ दिवस पेशंटच्या ICU सह उपचाराला बर्यापैकी खर्च होतोच. आ.शेखर निकम यांनाही उदय भेटून आला होता. साहेबांनी याला मदत करण्याविषयी सुचवलं होतं. मातृमंदिरकडून उदयचे बाबा आणि आई या दोघांनाही मिळून एकूण रु. ६२,००० ची मदत आपण केली.

या आर्थिक मदतीबरोबरच आपल्या समुपदेशन केंद्रातील संवाद सत्राचीही उदयला खूप मदत झाली. घरची गरिबी असलेले, नोकरी नसलेले आणि कुणी नातेवाईकांचीही मदत नसलेले असे कितीतरी उदय या कोविडकाळात धीराने आणि आशेने रोज सकाळ-संध्याकाळ हॉस्पिटलबाहेर बसलेले दिसतात. मातृमंदिरच्या हितचिंतकांनी तातडीने केलेल्या मदतीमुळेच आपण अशा अनेक ग्रामीण भागातील रुग्णांना आर्थिक मदत करून दिलासा देण्याचा प्रयत्न करतो आहोत.

**सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार**

# MATRUMANDIR DCHC




